**ठळक बातम्या**

- नवी दिल्लीत आयोजित १८व्या ब्रिक्स शिखर परिषदेची सांगता, वाढत्या भू-राजकीय तणावाच्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी एकजुटीनं काम करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ब्रिक्स देशांना आवाहन /विविध देशांच्या प्रमुखांशी केली द्विपक्षीय चर्चा

- भाजपा-एनडीए शासित सर्व राज्यांमध्ये २०२९च्या आधी समान नागरी कायदा आणू, अशी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची घोषणा

- कनिष्ठ गट हॉकी आशिया चषक स्पर्धेत भारताच्या महिला आणि पुरुष संघांची विजेतेपदाला गवसणी

**आणि**

- राज्यात गणेशोत्सवाच्या तयारीचा सर्वत्र उत्साह

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं  १८व्या ब्रिक्स शिखर परिषदेची आज सांगता झाली. विविधता ही या परिषदेची ओळख राहावी, सहकार्य ही प्रेरणा आणि प्रगती ही मानवतेच्या कल्याणासाठी योगदान देणारी असावी, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समारोपाच्या भाषणात केलं. ब्रिक्स हा फक्त देशांचा समूह नसून समस्यांवरचे तोडगे आणि चर्चांची एक परिसंस्था आहे आणि गेल्या २ दिवसांमध्ये हीच धारणा आणखी बळकट झाली आहे, असं ते म्हणाले. ब्रिक्स परिषदेत संमत झालेला नवी दिल्ली जाहीरनामा हा सामायिक दृष्टिकोन आणि भविष्यातल्या सहकार्याला एक स्पष्ट दिशा देईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

वाढत्या भू-राजकीय तणावाचा जगभरातल्या सामान्य नागरिकांच्या जीवनावर विपरीत परिणाम होत असून या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी आणि विशेषतः ग्लोबल साऊथ मधे सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यासाठी ब्रिक्स देशांनी एकजुटीनं काम करणं आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ब्रिक्स शिखर परिषदेच्या खुल्या सत्रात सांगितलं. 'तंत्रज्ञान तसंच महत्त्वपूर्ण खनिजांचा हत्यार म्हणून वापर' ही गंभीर बाब असून सर्वसमावेशक प्रगती आणि समृद्धीच्या मार्गात यामुळे अडथळा येऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी सध्या युद्धांमध्ये गुंतलेल्या रशिया, इराण यासह चीनसारख्या राष्ट्रांचे प्रमुख या शिखरपरिषदेत हजर होते.

भारताच्या अध्यक्षतेखाली लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता या चार मुद्यांवर ब्रिक्सनं लक्ष केंद्रित केलं आहे. आपल्या सहकार्य आणि पाठिंब्यामुळे आपल्या सामायिक दृष्टिकोनाचं 'सर्वांच्या हिता'त रूपांतर करण्यात यशस्वी झालो आहोत, याचा आनंद असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

**<><><><><>**

गेल्या ३ दिवसांत प्रधानमंत्र्यांनी एकूण १५ राष्ट्रांच्या प्रमुखांशी द्विपक्षीय बैठका घेतल्या. याशिवाय, त्यांनी अनेक जागतिक नेते आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या प्रमुखांसोबत अनौपचारिक चर्चाही केल्या. या बैठकांमध्ये द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करणं तसंच प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर विचारविनिमय करण्यावर त्यांनी भर दिला.

गेल्या २ दिवसांत मोदी यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. आज त्यांनी कझाकस्तानचे अध्यक्ष कासिम जोमार्ट तोकायेव यांच्याबरोबर भारत-कझाकिस्तान संबंधांचा आढावा घेतला. इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फत्ताह अल सिसी यांच्याबरोबर प्रादेशिक

घडामोडी आणि भारत-इजिप्त भागीदारीवर चर्चा झाली. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्याबरोबर विविध क्षेत्रांतली भागीदारी मजबूत करण्यावर भर देण्यात आला. फिलिपिन्सचे अध्यक्ष फर्डिनांड आर. मार्कोस ज्युनियर यांच्याबरोबर संरक्षण, व्यापार, गुंतवणूक, अंतराळ, रेल्वे, शिक्षण, पर्यटन, विज्ञान-तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रांतील सहकार्य वाढवायला सहमती दिली. या नेत्यांनी धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला.

**<><><><><>**

देशातल्या काही राज्यांमध्ये आधीच समान नागरी कायदा आणला असून २०२९च्या आधी भाजपा-एनडीए शासित २१ राज्यांमध्ये हा कायदा आणू, अशी घोषणा गृहमंत्री अमित शहा यांनी आज केली. मुंबईत ते वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते. आज सकाळी शहा यांचं मुंबई दौऱ्यावर आगमन झालं आणि त्यांनी विविध कार्यक्रमांमध्ये भाग घेतला. या दौऱ्याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हीसी-***

(१७ सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आणि ऑक्टोबर महिन्यात त्यांच्या राजकीय कारकीर्दीला २५ वर्षं पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत देशभरात सेवा संकल्प अभियान राबवण्यात येणार आहे, अशी माहिती आज शहा यांनी वार्ताहर परिषदेत दिली.

***होल्ड... बाईट- अमित शहा***

राज्यघटनेनं दिलेल्या अधिकारांचा वापर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गरिबांचं जीवनमान उंचावण्यासाठी, देशाला एक प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून घडवण्यासाठी, देश सुरक्षित करण्यासाठी, अंतर्गत सुरक्षा बळकट करण्यासाठी, कित्येक दशकांपासून प्रलंबित असलेल्या समस्या सोडवण्यासाठी केला, तसंच १५ ऑगस्ट २०४७पर्यंत विकसित भारताची निर्मिती करायचा संकल्प देशाला दिला, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. सेवा संकल्प अभियानांतर्गत १२ विविध कार्यक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. प्रधानमंत्री मोदी यांच्या कार्यकाळात देशानं विविध क्षेत्रांत केलेल्या प्रगतीचा आणि सरकारनं वेगवेगळ्या समाजघटकांसाठी राबवलेल्या योजनांचा उल्लेख शहा यांनी केला.

शहा यांनी आज सकाळी मुंबईतल्या एशियाटिक सोसायटीला भेट दिली आणि प्राचीन दस्तावेजांच्या प्रदर्शनाचं उद्घाटन केलं. देशाचा इतिहास आणि ज्ञान, वसाहतवादातून मुक्त करणं याचा अर्थ भूतकाळ पुसून टाकणं असा नव्हे, तर भारताच्या दृष्टिकोनातून ऐतिहासिक सत्य जगासमोर मांडणं, असा होतो, असं प्रतिपादन शहा यांनी केलं. त्यानंतर त्यांनी ५२व्या भारतीय रत्न आणि आभूषण पुरस्कार सोहळ्यात भाग घेतला. प्रयोगशाळेत तयार होणाऱ्या हिऱ्यांमुळे या व्यवसायात मोठं परिवर्तन झालं असून या पूर्ण मूल्यसाखळीच्या दृष्टीनं क्षमतावर्धन करायचं आवाहन त्यांनी या क्षेत्रातल्या व्यावसायिकांना केलं. अमित शहा उद्या नवी मुंबईत हिंदी दिवस २०२६ आणि ६व्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं उद्घाटन करणार आहेत. ते या कार्यक्रमाला संबोधितही करतील.)

**<><><><><>**

भारतीय महिला आणि पुरुष अशा दोन्ही संघांनी कनिष्ठ हॉकी आशिया चषक स्पर्धेच्या अजिंक्यपदावर नाव कोरलं आणि आगामी एफआयएच कनिष्ठ विश्वचषक

स्पर्धेतलं स्थान निश्चित केलं. महिला संघानं आजच्या अंतिम सामन्यातल्या विजयानंतर या स्पर्धेच्या जेतेपदांची हॅटट्रिक साधली. सानिका माने हिच्या एकमेव गोलच्या जोरावर भारतानं चीनवर मात केली. पुरुष संघानेही दक्षिण कोरियाचा ४-१नं पराभव केला आणि सलग दुसऱ्यांदा अजिंक्यपद पटकावलं.

<><><><><>

महिला टी-२० आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आज भारताचा सामना गतविजेत्या श्रीलंकेशी होणार आहे. दुबईत होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरू होईल. भारत आणि श्रीलंका या दोन्ही संघांनी आतापर्यंतची सर्व सामने जिंकून अंतिम फेरी गाठली आहे. सात वेळचा आशिया चषक विजेता भारत उपांत्य सामन्यात बांगलादेशचा ४० धावांनी पराभव करून अंतिम फेरीत पोहोचला. तर श्रीलंकेनं पाकिस्तानवर चार गडी राखून विजय मिळवला.

<><><><><>

पॅरा बॅडमिंटनमध्ये, जपान इंटरनॅशनल स्पर्धेत भारताच्या पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेत्या प्रमोद भगत यानं आज पुरुष एकेरीच्या एस एल थ्री प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. त्यानं अंतिम सामन्यात भारताच्याच उमेश कुमार याचा २१-१६. २१-८ असा पराभव केला. पुरुष दुहेरीच्या एस एल थ्री एस यु फाईव्ह प्रकारात मात्र प्रमोद आणि सुकांत कदम यांच्या जोडीला रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं. अंतिम सामन्यात इंडोनेशियाच्या हिकमत रामदानी आणि फ्रेडी सेतियावान या जोडीनं त्यांना ५-२१, १५-२१ असं नमवलं.

<><><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या जेतेपदासाठी आज रात्री अलेक्झांडर झ्वेरेव्ह आणि बेन शेल्टन यांच्यात अंतिम लढत होईल. भारतीय वेळेनुसार आज रात्री साडेअकरा वाजता हा सामना सुरू होईल.

उपांत्य फेरीच्या लढतीत झ्वेरेव्ह यानं रशियाच्या कॅरेन खचानोव्हचा पराभव करून, तर शेल्टन यानं अमेरिकेच्याच फ्रान्सिस टियाफोला नमवून अंतिम फेरीत प्रवेश केला. शेल्टन याच्या कारकिर्दीतला हा पहिला ग्रँडस्लॅम अंतिम सामना असणार आहे.

<><><><>

गणेशेत्सवाची तयारी सर्वत्र उत्साहानं सुरु आहे. राज्यात अनेक ठिकाणी सार्वजनिक उत्सवांच्या मोठमोठ्या मूर्ती आधीच मंडपात विराजमान झाल्या आहेत. बाजारपेठांमधे फुलं, सजावटीचं सामान, पूजासाहित्य इत्यादी खरेदी करण्यासाठी गर्दी झाली आहे. विविध दुकानं, ऑनलाईन विक्री सेवा इत्यादींमधे गणेशोत्सवानिमित्त विशेष सवलती उपलब्ध आहेत. गौरी गणपती सणाकरता गावी जाण्यासाठी भाविकांची गर्दी आहे. रस्त्यांवर अनेक ठिकाणी वाहतुकीची कोंडी झाली आहे, तर रेल्वे आणि एसटी गाड्याही प्रवासी भरभरून जात आहेत.

मुंबईसह अनेक ठिकाणी आज सकाळपासून पावसानं जोरदार हजेरी लावल्यामुळे उत्साहावर काहीसा परिणाम झाल्याचं दिसत आहे.

<><><><>

गणेशोत्सवानिमित्त पुण्यातून कोकणासह सांगली, सातारा, कोल्हापूर आणि राज्यातल्या विविध भागांमध्ये जाणाऱ्या वाहनांची संख्या अचानक वाढल्यानं वारजे परिसरात तब्बल सात तास वाहतूक कोंडी झाली.

मुंबईतही पुनर्बांधणी आणि गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेचा उपाय म्हणून मस्जिद आणि माटुंगा स्थानकांवरचे चार पादचारी पूल बंद करण्याबाबत मध्य रेल्वेला बृहन्मुंबई महानगरपालिकेनं सूचना दिली आहे.

<><><><>

गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या भाविकांच्या वाहनांचे आज दोन अपघात झाले. राजापूरजवळ टेम्पो ट्रॅव्हलर उलटून चालकासह १६ जण जखमी झाले.

यापैकी १० जणांची प्रकृती गंभीर आहे. खेड तालुक्यात खवटीजवळ दुचाकी २५ फूट खोल खड्ड्यात कोसळून चालकाचा मृत्यू झाला, तर सोबतची तरुणी गंभीर जखमी झाली.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, आणि विदर्भात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता, हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//